नि.दि.दावा क्र.८८८/२०१६

निशाणी क्र.६५

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ यांचा उर्वरित उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. गवळी यांच्यामार्फतः</u>**

माझ्या वडिलांचे पुर्वीचे घर व माळी पैकी तुकारामने एक घर विकले व दुसरे घर माझ्या नावावर आहे.

प्रश्न– ते दोन्ही घरे तुम्ही दाव्यात का सामील केले नाही?

उत्तर– ते दोन्ही घरे माझ्या वाटणीला आले होते म्हणुन सामील करण्याचे प्रश्नच नाही.

त्या घराचे वाटप झाल्याबाबत माझ्याकडे लेखी पुरावा नाही. तुकारामने एक घर विकल्याबाबत त्या खरेदीखताची नक्कल माझ्या कडे नाही. ते घर माझ्या चुलतीच्या जावायाला विकले. हे म्हणणे खरे नाही की रामदासने हरेश्वर ट्रान्सपोर्ट कंपनी चालु केल्यावर एक ट्रक माझ्या नावे घेतला होता, एक ट्रक आईच्या नावे घेतला होता व एक ट्रक बाबुरावच्या नावे घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की रामदासने ट्रान्सपोर्ट चा व्यवहास चालु केल्यावर प्रतिवादी नं.१ चे वडील त्यास घेऊन मुंबई येथे गेले असता तिथे आमच्या नावावर ट्रक असल्याचे पाहुन त्यास कुटूंबाचा एकत्रीत व्यवसाय असल्याबाबत वाटले म्हणुन तुकारामने रामदास सोबत ट्रान्सपोर्ट व्यवसायात काम केले. हे म्हणणे खरे नाही की तो व्यवसाय भरभराटीचा जात असल्याने दावा मिळकती त्या व्यवसायाच्या उत्पन्नातून विकत घेतल्या होत्या. मी सांगतो की शेतीच्या उत्पन्नातून विकत घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की रामदास व तुकाराम या दोन्हीचे महानगर बँकेत कर्ज खाते होते. हे म्हणणे खरे नाही की रामदासच्या कंपनीतील ट्रेलर व ट्रक असेच पडुन असल्याने रामदासने तुकाराम यास त्यांची कंपनी व स्वतःची कंपनी दोन्ही चालविण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की रामदासाच्या कंपनीतील ट्रेलर व गाडयाबाबतच्या खर्च व टॅक्स तुकारामने भरला व तुकारामने तो खर्च भरला. हे मला माहित नाही की रामदास व तुकाराम यांनी गट नं.९४३, ११४५, ३११ व १२६ या जमीनी व्यवसायासाठी तारण दिल्या होत्या. म्हणणे खरे नाही की मी त्या तारण बाबत संमती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की रामदास ने घेतलेले कर्ज थकल्यावर सदर जमीनी जप्तील्या आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की कर्ज थकीत झाल्यामुळे तुकराम यांनी रामदास व मला काहीतरी पैसे भरा असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की मी

तुकाराम यास पैसे भरायला नकार दिला व त्यानंतर तुकारामने वन टाईम सेटलमेंटसाठी बँकेकडे अर्ज दिल्यावर सदर कर्ज ५३ लाख रुपयामध्ये भरण्याचे ठरले. हे म्हणणे खरे नाही की तुकाराम यांच्या ट्रान्सपोर्ट व्यवसायातुन त्यांनी गट नं.१७० मधील माझ्या नावावरती जमीन, माझ्या पत्नीच्या नावावर दोन गट, रामदास च्या नावावर एक जमीन आणि माझ्या वडीलांच्या नावावर एक जमीन तसेच गट नं.१७० मध्ये विहिर खोदली होती व ज्या माडीत मी राहत आहे ती माडीही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की सदर जमीनी जप्तील्या आल्याने व ५३ लाख रुपये कर्ज भरायचे असल्याने तुकारामने त्यांच्या स्वतःच्या नाववरील प्लॅट, सोने, एलआयसी पॉलीसी, खाजगी कर्ज काढुन ऑफीस विकुन व दोन ट्रक विकुन सदरचे कर्ज भरले. हे म्हणणे खरे नाही की रामदासने त्यांची पत्नी व मुलाच्या नावावर ट्रक घेतले व तुकारामच्या नाववर एक ट्रक घेतला. हे म्हणणे खरे नाही की तुकारामने ट्रान्सपोर्ट व्यवसायातुन डोगरी, मुंबई येथे लकी मेंशन येथे रुम नं.२ व ३, वळाला येथे टर्मिनल गोडाऊन, ऑफिस आणि ओतुर, पुणे येथे ५ एकर जमीन, १२ ट्रेलर त्यांच्या नावावर विकत घेतले. हे म्हणणे खरे नाही की कर्ज भरल्यानंतर, रामदासने माझ्या नावावरील ट्रक व माझ्या वडीलांच्या नावावरील ट्रक विकुन टाकले. हे म्हणणे खरे नाही की तुकाराम यास व्याजाने खाजगी पैसे घेऊन कर्ज भरावे लागले. हे म्हणणे खरे नाही की बँकेनेही सांगितले आहे की तुकाराम यांनी एकटयाने बँकेचे कर्ज भरुन जमीनीवरील बोजा काढला आहे. हे म्हणणे खरे नाही की रामदास व प्रतिवादी क्र.३ यांनी तुकाराम यास तुला मुंबई कडील व्यवसायामध्ये काही देणार नाही असे सांगितले व तुकारामचे नुकसान झाल्याबाबत रामदासच्या नावे असलेल्या जमीनी गट नं.१२६, ३११, ८७५ आणि ७३८/१९ मध्ये जमीनी देणार असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की गावात त्याबाबत बैठक झाली व गट नं.१२६, ३११, ८७५ आणि ७३८/१९ या जमीनी तुकारामच्या नावे दिल्या. हे म्हणणे खरे नाही की रामदास हे आजारी झाले असल्याने तुकाराम यास काही दिले नाही या भावनेने तुकारामला सदर जमीनी दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की गट नं.८७५ मधील जमीनीचे खरेदीखत रामदासच्या नावे केले होते. मी सांगतो की रामदासनेच घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यांचे मुळ खरेदीखत माझ्या ताब्यात होते व त्यानंतर मी तुकारामच्या ताब्यात दिले होते.

हे म्हणणे खरे नाही की संपुर्ण कर्जाची ५३ लाख रुपयांची रक्कम तुकाराम यांनी भरली आहे. हे म्हणणे खरे नाही की तुकाराम आज रोजी भाडयाच्या घरात राहत असुन

त्याला राहण्यास स्वतःचे घर नाही. हे म्हणणे खरे नाही की जमीनी पडीक ठेवुन एक जमीन मी करत आहे व तुकारामने त्यांच्या खर्चातुन बांधलेल्या माळीमध्ये मी राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे व प्रतिवादीमध्ये काही वाद नसुन केवळ प्रतिवादीला त्रास देण्यासाठी मी हा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की तुकाराम व त्यांच्या पत्नीस मुल बाळ नाही. हे म्हणणे खरे नाही की गट नं.१२६, ३११, ८७५ आणि ७३८/१९ या जमीनी रामदासच्या नावावरुन तुकाराम यांच्या नावावर कोर्टाच्या हुकूम नामाद्वारे केलेले आहे. हे मला माहित नाही की त्या दाव्यात रामदासचे मुले–मुली सामील होते. हे म्हणणे खरे नाही की माझी व प्रतिवादी क्र.३ ची बैठक झाली व तुकाराम हा जमीनीबाबत वाद उपस्थित करेल याचा विचार करुन मी प्रतिवादी क्र.३ च्या सांगण्यावरुन हा दावा दाखल केला. यापूर्वी माझे व प्रतिवादीमध्ये वाद झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की रामदास व प्रतिवादी क्र.३ यांनी तुकाराम यास दावा कडील जमीनीचे तुझे तु काही करुन कर्ज भर असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की मोरेश्वरने मुंबई व ओतुर येथील जमीनी त्यांच्या नावावर ठेवुन तुकारामला न देता मला सांगुन मी हा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की तुकाराम यास जमीन मिळु नये व त्याला अडचण करण्यासाठी मी हा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की मी हा खोटा दावा दाखल केला आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

दिनांक : ०९/०५/२०२५

**( एन.एस.सबनीस )**

२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

पारनेर